जावक क्रमांक/खाप्राशा/प्रथम मा/ ९०४
प्राथमिक शिक्षण समिती, महानगरपालिका,
कोल्हापूर. दिनांकः- १३ / ०२/२०२३

13 FEB 2023

प्रति,
**अध्यक्ष / सचिव,**
पोदार एज्यूकेशन ट्रस्ट,
परेल, मुंबई ४०००१२

विषय :- कायम विना अनुदान तत्वावर सन २०१० - २०११ या शैक्षणिक वर्षापासून नवीन प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देणे बाबत..

संदर्भ :- १) आपले शाळेकडील त्रुटींच्या पूर्ततेसह सादर केलेला दि.२९.०९.२०२२ चा फेर प्रस्ताव
२) मा.शिक्षणाधिकारी (प्राथ),जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील जा.क्र./कोजिप/६९५/२०१८, दि.२७.०३.२०१८ चे पत्र
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई कडील शासनपत्र क्र.नाहप्र २०१३/(७५/१३) माशि-१, दि.०२ ऑगष्ट २०१३
४) मान.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे कडील पत्र क्र.अमाशा/नाहप्र/२०१३/सीबीएसई/१५-क (५)/९०३७, दि.१७.०९.२०१३

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, आपल्या संस्थेस गट नंबर १०३२, ए वॉर्ड, रिंग रोड, म्हाडा कॉलनीजवळ, कसबा करवीर, कोल्हापूर येथे पोदार इंटरनॅशनल स्कूल, कोल्हापूर या नावाची इंग्रजी माध्यमाची खाजगी शाळा कायम विना अनुदान तत्वावर खाली नमूद अटीस अधिन राहून जून २०१० (सन २०१०-११) पासून प्रथम मान्यता देण्यात येत अहे. सदरची मान्यता प्रत्यक्षात सुरु असलेल्या इ. १ ली ते ८ वी च्या वर्गासह (प्रथम वर्ग) देण्यात येत आहे.

| अ क्र | संस्था, शाळेचे नाव, ठिकाण व पत्ता | माध्यम | शाळा प्रकार | शाळा परवानगी वर्ष | मंजूरीचे तत्व | मंडळ संलग्नता | सन २०१३ -१४ अखेर मान्य वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोदार एज्यूकेशन ट्रस्ट, परेल, मुंबइ संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, गट नंबर १०३२, ए वॉर्ड, रिंग रोड, म्हाडा कॉलनीजवळ, कसबा करवीर, कोल्हापूर | इंग्रजी | नवीन प्राथमिक ते उच्च प्राथमिक | सन २०१० - ११ | कायम विना अनुदानित / स्वयंअर्थ सहाय्यित | राज्य मंडळ | इ. १ ली ते ८ वी |

अटी :-

१) सदरची मान्यता ही संस्था / शाळास्तरावरुन सादर केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येत असून सादर केलेली माहिती चूकीची आहे असे निदर्शनास आल्यास तसेच माहितीमध्ये काही तफावत आढळल्यस देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येईल. त्यामूळे काही पेचप्रसंग निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था व शाळा प्रमुख यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

२) शासनस्तर अथवा वरिष्ठ कार्यालयाकडून सदर मान्यतेबाबत काही नव्याने आदेश प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे फेर विचार करुन कार्यवाही ठेवण्यात येईल.

कृपया मागे पहा..

३) संस्थेला शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाहीत.

४) परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना केंद्र व राज्य शासनाचे शिक्षण विषयक अधिनियम, नियम, वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता कायम विना अनुदान तत्वावरील नवीन शाळा असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील. मान्यता दिलेल्या शाळांचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

६) नवीन शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक राहील. प्राथमिक शाळांच्या संदर्भात आर.टी.ई. ॲक्ट २००९ मध्ये नमुद केलेल्या सर्व मानकांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

७) अधिनियमातील तरतूदीनुसार संस्था वरील वर्ग कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास कायमपणे अर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे. या वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी दिली असल्याने भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

८) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पहिजे.

९) शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद, शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे. तसेच नियुक्त शिक्षक वर्गाची सक्षम प्राधि-यांकडून मान्यता घेतली पाहिजे. तसेच सदर कर्मचा-यांचे वेतन व भत्ते नियमानुसार संस्थेने दिले पाहिजेत.

१०) संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम,पाठ्यपुस्तके, मुल्यांकन पध्दती शालेय व सहशालेय/कार्यक्रम उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

११) संस्थेने पोदार इंटरनॅशनल स्कूल, कोल्हापूर या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत व विश्वासार्ह स्वरुपता कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

१२) संस्थेने/शाळेने माध्यमिक शाळा संहिता,महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदी तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे,कार्यपध्दतींचे,नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

१३) शासन निर्णय दि.०३.११.२००९ नुसार व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शाळेची इमारत नॅशनल बिल्डींग कोड नुसार असणे आवश्यक आहे.

(शंकर केशव यादव)
**प्रशासनाधिकारी**
**प्राथमिक शिक्षण समिती, म.न.पा.,**
कोल्हापूर.

<u>प्रत सविनय सादर</u> –
मा.शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.